(२८२)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/झोनिआ/1133/२०२३
दिनांक : 12/09/२०२३

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश

## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निर्मुलन आदेश

<u>प्रस्तावना -</u>

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद पेठ घोरपडे पेठ, सि.स.नं.४१/१, या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ३६९.६० चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आले बाबत प्र.सहायक संचालक नगररचना यांनी दि.१७/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी तथा सक्षम विभाग क्र.१, झो.पु.प्रा., पुणे यांना कळविले आहे;

(४) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ४१ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ३५, बिगर निवासी पात्र ० आणि संयुक्त ० या प्रमाणे एकुण ३५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(५) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.२७/११/२०१८ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ६-१२, २०१८ पृष्ठ मध्ये क्र. ३९-४० तसेच दै.केसरी या दैनिक वृत्तपत्रात दि.०६/१२/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.०१/१२/२०१८ रोजी डकविण्यात आलेला आहे.

(६) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

(७) विकसक मे.सम्यक गृहनिर्माण प्रा.लि. यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणा-या सर्व झोपडीधारकांची झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था आम्ही भाडे देवुन करणार आहोत त्याची काणेतीही तोषीस आम्ही झोपुप्राला लागु देणार नसलेबाबत रु.१००/- च्या मुंद्राकावरील दि.०६/०९/२०२३ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. या संदर्भात प्राधिकरणामार्फत किमान भाडेदर निर्धारणा करणारे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

(८) सदर क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे खालीलप्रमाणे कळवित येत आहे,

a) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

b) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी.

c) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

d) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

e) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

आदेश :-

(१) मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये सदरचा आदेश कायम करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,

बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र - पुणे महानगरपालिका.
झोपडपट्टीचे नाव - सि.स.नं.४१/१, घोरपडे पेठ, पुणे

| पेठ | सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्रफळ (चौ.मी.) | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| घोरपडे पेठ | सि.स.नं.४१/१ | सरकारी | ३६९.६० चौ.मी | पुर्वेस - सि.स.नं.३२, ३३अ, ३३ब, ३४ | |
| | | | | पश्चिमेस - लागु बोळ | |
| | | | | दक्षिणेस - सि.स.नं.३५, ४० व ४१ | |
| | | | | उत्तरेस - सि.स.नं.३२ पैकी | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- / /२०२३

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरील पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करुन त्यांच्या ०५ प्रती या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती.
४. विकसक मे.संम्यक गृहनिर्माण प्रा.लि. १०१/१६, कर्वे रोड, पुणे-४११००४ यांना माहितीस्तव.